CNR No. MHOS-02000079-2018

एल.ए.आर.क्र. १/२०१८ मधील नि.क्र.२२ वरील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज जाबदार यांनी हरकतदार व साक्षिदारा यांचा उलट तपास घेणेसाठी मुदत मिळणेसाठी दिला आहे. जाबदार यांच्या म्हणण्यानुसार कागदपत्रांची पुर्तता न झाल्यामुळे उलट तपासासाठी मुदत मागत आहेत. सबब अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

२. तक्रारदार यांनी सदर अर्जास जोरदार हरकत घेतली आहे.

३. प्रतिपक्षांच्या परस्पर विरोधी कथनांवरुन माझे समोर खालील मुद्दे उपस्थित होतात. मी त्यावरील माझे निष्कर्ष कारणांस त्यापुढे देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | जाबदार यांनी मागणी केल्यानुसार उलट तपास घेणेसाठी मुदत मिळणेस पात्र आहेत काय ? | होय. |
| २ | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

कारणमीमांसा

४. सदर मुळ अर्ज तक्रारदार व जाबदार यांचे संपादीत जमिनीच्या नुकसान भरपाई मध्ये हिस्से ठरवण्याकरीता राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ कलम ३ एच (४) नुसार दाखल आहे. आज रोजी केस हरकतदार प्रभावती हिचे उलट तपासासाठी आहे व साक्षिदार हजर आहे. परंतु सदर प्रकरण गुणदोषावर निकाली करण्यासाठी जाबदार यास उलट तपासासाठी संधी देणे योग्य आहे. सबब मुद्दा नं.१ होकारार्थी देऊन मुद्दा नं.२ साठी खालील आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

१. अर्ज रक्कम रु.५०/- खर्च जाबदार याने हरकतदार नं. १ हिला देण्याच्या अटीवर मंजूर करणेत येत आहे.

Digitally signed by Vaibhav Bajrang Ghadge
Date: 2020.01.04 12:50:19 +0530

**(व्ही.बी.घाडगे)**

दिनांकः- ३०/१२/२०१९

६ वे सह दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर,
उस्मानाबाद.